**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २६४ वा | सोमवार, दि. ०२ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कोरोनाचा महाराष्ट्राला विळखा !

## दोन आरोग्यमंत्री असलेल्या जिल्ह्यात आणखी एका महिलेचा मृत्यू

## आषाढी यात्रेच्या तोंडावर कोरोनाचे संकट; सोलापूरात आढळले 2 रूग्ण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात कोरोनाबाधितांची संख्या वाढत असतानाच कोल्हापूरमध्येही कोरोना बाधित महिलेचा बळी गेला आहे. 75 वर्षीय महिलेवर गेल्या चार दिवसांपासून सीपीआय रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते.

मात्र, आज (1 जून) उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाला. ही महिला पाचगावात असून ती कोरोना बाधित होती. दरम्यान महिलेच्या मृत्यूनंतर पालिका कर्मचाऱ्यांनी पीपी किट नसल्याने संबंधित महिलेवर अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ दोघेही कोल्हापूरचे आहेत. त्यामुळे दोन्ही मंत्र्यांच्या जिल्ह्यात कोरोनाबाधित महिलेचा मृत्यू झाला आहे.

दुसरीकडे, देशात कोरोना विषाणूच्या सक्रिय रुग्णांची संख्या 3783 वर पोहोचली आहे. आरोग्य विभागाच्या वेबसाइटनुसार, 22 मे रोजी भारतात 157 रुग्ण होते. 9 दिवसांत कोरोनाच्या रुग्णांमध्ये 1372 टक्के वाढ झाली आहे. केरळमध्ये सर्वाधिक 1400 रुग्ण आहेत. त्याच वेळी, महाराष्ट्रात 485 आणि दिल्लीत 436 सक्रिय रुग्ण आहेत. जानेवारीपासून कोरोनामुळे 29 मृत्यू झाले आहेत. त्यापैकी गेल्या दोन दिवसांत २२ जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी, बेंगळुरूमध्ये एका 63 वर्षीय पुरूषाचा मृत्यू झाला. त्याला दोन्ही लसींसह बूस्टर डोस देखील देण्यात आला होता. त्याच वेळी, दिल्लीत एका 60 वर्षीय पुरूषाचा मृत्यू झाला. महाराष्ट्र-केरळमध्ये सर्वाधिक 8-7 जणांचा मृत्यू झाला आहे.

**महाराष्ट्रात 9 हजारांहून अधिक कोविड चाचण्या**

महाराष्ट्र सरकारने सांगितले की शनिवारी कोविडचे 68 नवीन रुग्ण आढळले. तर जानेवारी 2025 पासून मुंबईत एकूण 749 रुग्ण आढळले आहेत. जानेवारीपासून राज्यात 9592 कोविड चाचण्या घेण्यात आल्या आहेत.

अवघ्या काही दिवसांवर आषाढी सोहळा येऊन ठेपला असताना सोलापूर जिल्ह्यात दोन कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्यामुळे प्रशासनामध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पालखी सोहळ्यादरम्यान आपल्याला अत्यंत दक्षता बाळगावी लागणार असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्याची योग्य काळजी घ्यावी आणि लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले यांनी केले आहे.

विठुरायाच्या आषाढी सोहळ्यासाठी राज्यभरातून पालखी सोहळे निघण्याची तयारी सुरू असताना, सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात दोन कोविड पॉझिटिव्ह रुग्ण सापडल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. माळशिरस तालुक्यातील राऊतनगर-अकलूज आणि माळीनगर येथे कोरोना रुग्ण आढळल्याची माहिती डॉ. एकनाथ बोधले यांनी दिली असून, नागरिकांना खबरदारी बाळगण्याचे आव्हान केले आहे.



सदर रुग्णांनी प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे खाजगी 'एपेक्स हॉस्पिटल' आणि 'हीदम हॉस्पिटल' येथे उपचारासाठी दाखल झाले असता, खाजगी लॅबमध्ये त्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ते कोरोना पॉझिटिव्ह असल्याचे निदान झाले. याची खबर माळशिरस तालुका आरोग्य विभागाला मिळताच, त्यांनी सदर दोन्ही कुटुंबातील व्यक्तींची तात्काळ तपासणी केली केली आहे. यातील एका रुग्णाने प्रवास केल्याचेही समोर आले आहे. या दोन्ही रुग्णांची माहिती सोलापूर जिल्हा चिकित्सकांना दिल्याचे डॉ. एकनाथ बोधले यांनी सांगितले.

**- डॉ. एकनाथ बोधले,** (पंढरपूर तालुका आरोग्य अधिकारी)

### नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज

'आरोग्य अधिकाऱ्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे, विशेषतः ज्यांना इतर आरोग्य समस्या आहेत, त्यांनी मास्क वापरणे, सामाजिक अंतर राखणे आणि लसीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. सध्या, बहुतेक रुग्ण सौम्य लक्षणांसह घरीच बरे होत आहेत, त्यामुळे घाबरण्याची गरज नाही, परंतु खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.'

### आरोग्य विभाग सतर्क, उपाययोजनांना सुरुवात

सद्यस्थितीमध्ये आषाढीसाठी येणाऱ्या पालखी सोहळ्याबाबत कोरोनाच्या उपाययोजना म्हणून जिल्हा आरोग्य विभागाने २५ हजार रॅट किट, १० हजार आरटीपीसीआर ट्यूब, १० हजार एन २५ मास्क, ५० हजार सर्जिकल मास्क, ५०० पीपीई किट, १०० एमएलच्या १००० सॅनिटायझर बाटल्या आणि १० हजार हँड ग्लोजची मागणी केली आहे. येणाऱ्या पालखी सोहळ्यामध्ये आपल्याला अतिदक्षता बाळगावी लागणार आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्य विषयक काळजी घ्यावी आणि लक्षणे आढळताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. बोधले यांनी पुन्हा केले आहे.

# आष्टी तलावात केवळ ५८ टक्के पाणीसाठा

## आता संपूर्ण लक्ष माढावर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील ऐतिहासिक अशा "आष्टी" तलावात गेल्या पंधरा दिवसापासून पडत असलेल्या पावसाने ५८ टक्के पाणी साठा झाला आहे. मात्र आष्टी तलावातील पाणीसाठा १०० टक्के होण्यासाठीची सर्व भिस्त आता माढा तालुक्यातील काही गावात पडणाऱ्या पावसावर आहे.

आष्टी तलावाची उभारणी व त्यात होणारा पाणीसाठा हा पूर्ण पावसाच्या पाण्यावर आहे. या तलावाची पाणी साठवण क्षमता सुमारे एक टीएमसी इतकी आहे. या तलावाच्या माध्यमातून व त्यातून जलवाहिन्या टाकून पापरी, खंडाळी, येवती, आष्टी, आदीसह अन्य गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतापर्यंत पाणी आणले आहे.

या तलावाच्या पाण्यावर डाळिंब, द्राक्ष, पेरू, सीताफळ, केळी या फळबागासह ऊस, मका अशी पिके शेतकऱ्यांनी केली आहेत. या संपूर्ण पिकांचा विचार केला तर २२ हजार एकर क्षेत्र या तलावातील पाण्याच्या माध्यमातून बागायती झाले आहे.

इंग्रजांच्या काळातील राणी व्हिक्टोरिया हिने या तलावाची



निर्मिती केली आहे. मात्र गेल्या पंधरा वीस वर्षा पासून शासनाने भूगभार्तील पाणीसाठा वाढावा यासाठी "पाणी आडवा पाणी जिरवा" ही योजना सुरू केली आहे. त्यामुळे ओढे, नाले, बंधारे यांच्या माध्यमातून या तलावात येणारे पाणी जागच्या जागी थांबले. या तलावाच्या पाण्यावर सध्या अकरा गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित आहेत.

माढा तालुक्यातील अरण, भेंड, तुळशी यासह अन्य गावात पडणाऱ्या पावसाने ओढ्या नाल्याला पाणी येते व तेच पाणी आष्टी तलावात येते. दररोजच्या पडणाऱ्या पावसाने आष्टी तलाव १०० टक्के होण्यास फारसा वेळ लागणार नाही. मात्र, १०० टक्के ची सर्व भिस्त माढा तालुक्यातील काही गावात पडणाऱ्या पावसावर व निसर्गावर आहे हे तितकेच खरे.

# अवकाळी पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण आणि मध्य भारतात अवकाळी आणि पूर्व मान्सून पावसाने धुवादार बॅटिंग केली. मे महिन्यातच पावसाने अनेक रेकॉर्ड ब्रेक केले. त्यामुळे हाता तोंडाशी आलेले काही पीक हातचे गेले.

मुसळधार पावसाने कोट्यवधी रुपयांच्या कांद्याचे पीक खराब झाले. त्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटनेने नुकसान भरपाईची मागणी केली. शेतकऱ्यांनी प्रति एकर 1 लाख रुपये भरपाईची मागणी केली आहे. कांद्याचे मोठे नुकसान झाल्याने आता कांद्याचा भाव वधारणार का, असा सवाल केला जात आहे.

**मुसळधार पावसाने कांद्याच्या उत्पादनाला फटका**

राज्यातील कांदा उत्पादक संघटनेने भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघाला, NAFED ने पारदर्शक कांदा खरेदीची मागणी केली आहे. याविषयीचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे. मे महिन्यात अभूतपूर्व पाऊस कोसळला. नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर, सांगली, बीड, धाराशिव, परभणी, जालना, बुलढाणा, अकोला या जिल्ह्यात कांदा उत्पादन घेण्यात येते. तिथे हा फटका बसला. त्यामुळे उत्पादन घटण्याची भीती व्यक्त होत आहे.

कांदा उत्पादकांनुसार, ज्या कांद्याची कापणी झाली होती, पण तो जमा करता आला नाही. तो कांदा खराब झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति क्विंटल 2000 रुपये सबसिडी देण्याची मागणी केली आहे. कारण हा कांदा सडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच यातील जो माल चांगला आहे, त्याला सुद्धा कमी भाव मिळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांचा हजारो क्विंटल कांदा सडल्याचे आणि त्यांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.



### कांद्याच्या किंमती वाढतील का?

मुसळधार पावसात कांदा खराब झाल्याने येत्या काळात बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन किंमत वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी पण पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले होते. त्यामुळे किंमती वधारल्या होत्या. कांद्याचे संकट दूर करण्यासाठी केंद्र सरकारला युद्ध पातळीवर काम करावे लागले होते. अनेक शेतकरी या काळात मालामाल झाले होते. बफर स्टॉकसाठी आतापासूनच केंद्र सरकारने हालचाल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# आषाढीसाठी सोलापूर झेडपी प्रशासन लागले कामाला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा कालावधीत संताच्या पालखी मार्गावरील ग्रामपंचायती मधील कामे वेळेत संपवा. पावसाची स्थिती लक्षात घेऊन वारकरी यांना सेवा द्या. त्या दृष्ट्रीने वारीचे नियोजन करा, अशा स्पष्ट सुचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिल्या.



पंढरपूर पंचायत समिती येथे पालखी मार्गावरील ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक व विभाग प्रमुख यांचे बैठकीचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी महाराणा प्रताप यांचे जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन सिईओ कुलदीप जंगम यांचे हस्ते करणेत आले.

या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशील संसारे यांचे सब विभाग प्रमुख उपस्थित होते.

# सोलापूर विद्यापीठात अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध उपक्रम!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रणरागिणी, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सबंध भारतभर बारा हजाराहून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पाण्यासाठी पाणवठे तसेच बारवे निर्माण करून जलव्यवस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा आदर्श राज्यकारभार, युद्धनीती, न्यायव्यवस्था यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते, असे गोरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले.

शनिवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्याचे ग्रामविकास, पंचायतराज मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. यावेळी पीएम उषा योजनेतून दोन नवीन इमारतींचा पायाभरणी समारंभ तसेच विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मोठे असून त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान केंद्र व राज्य सरकारकडून त्रिशताब्दी जयंतीनिमित्त करण्यात येत आहे. 2019 मध्ये सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देऊन एक प्रकारचा सन्मान तत्कालीन सरकारकडून करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना सासरे मल्हारराव होळकर यांच्याकडून चांगली शिकवण मिळाली. पुढे त्या राज्यकारभारात व न्यायदानात पारंगत झाल्या. विद्यापीठाने त्यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे घेऊन जाताना त्यांच्या नावाप्रमाणे साजेशे कारभार करावे. विविध नवनवीन कोर्सेस सुरू करावेत. बांधकामास व विद्यापीठाच्या विविध कामास कसलाही निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

(पान 2 वर..)






# शिवसृष्टीबाहेरील सूचना फलकावर लघुशंका; कुलकर्णीला केली अटक

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर आधारित स्मारक असलेल्या शिवसृष्टी (आंबेगाव बुद्रुक) बाहेरील सूचना फलकावर एकाने लघुशंका केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. 31) पहाटे घडली. या कृत्यामुळे शिवभक्तांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. संबंधित दाम्पत्याविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

अमोल अरुण कुलकर्णी (वय 59) आणि त्यांची पत्नी स्नेहा अमोल कुलकर्णी (वय 57, दोघेही रा. धायरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहे. याबाबत नवनाथ तुकाराम अमराळे (वय 23) यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी पहाटे 3 वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अमोल हे सरकारी सेवेतून निवृत्त झाल्याची माहिती आहे.

फिर्यादी अमराळे हे त्यांच्या मित्रासह नवले ब्रिजहून निघाले होते. ते शिवसृष्टीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळून पुढे जात असताना तेथे दोन चारचाकी वाहने उभी असल्याचे त्यांना दिसले. त्यातील एका गाडीशेजारी एक वयोवृद्ध पुरुष थेट सूचना फलकावर लघुशंका करीत होते, तर त्यांच्यासोबत एक महिला शेजारी उभी होती. फिर्यादींनी विचारणा



(पान 2 वर..)

# पावसामुळे उमराणी बंधारा तुडुंब भरला; सोलापूर जिल्ह्यात पुन्हा मुसळधार पाऊस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात अवकाळी पाऊस जोरदार बरसला आहे. यात सोलापूर जिल्ह्यात मे महिन्यात रेकॉर्डब्रेक पाऊस पडला आहे. यामुळे भीमा नदीवरील महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवर लवंगी- सादेपूर दरम्यान कर्नाटक सरकारने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्वयंचलित उमराणी बंधारा बांधला आहे.

हा बंधारा तुडुंब भरला आहे. दरम्यान सोलापूर जिल्ह्यात काही भागात आज पुन्हा जोरदार पाऊस झाला.

राज्यात यंदा अवकाळी पावसाने हाहाकार माजविला होता. काही भागात तर अगदी मुसळधार पावसामुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. या पावसामुळे उमराणी बंधारा मे महिन्यातच तुडुंब भरून ओसंडून वाहू लागला आहे. तब्बल १३३ कोटी खर्च करून बंधारा बांधण्यात आला असून पाऊण टीएमसी पाण्याची साठवण क्षमता याची आहे. ३० फुट उंचीचा हा बंधारा आहे. या बंधाऱ्यामुळे १० हजार १२० एकर क्षेत्राला सिंचनाचा फायदा होणार आहे.



**अक्कलकोट तालुक्यात मुसळधार पावसाचा जोर कायम**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुकात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. दरम्यान तालुक्यातील बोरगाव, घोळसगाव, किरनाळी गावांना पावसाने झोडपले आहे. धाराशिवच्या तुळजापूर तालुक्यात झालेल्या पावसामुळे अक्कलकोट तालुक्यातील ओढे - नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. तर पावसाच्या जोरदार बॅटिंगमुळे शेतशिवारात देखील पाणी शिरले आहे.

**नुकसानीचे पंचनामे सुरु**

दरम्यान बार्शी तालुक्यातील साकत येथे अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी आलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नदीच्या गुडघाभर पाण्यातून वाट काढावी लागत आहे. निलकंठा नदीच्या पाण्यातून कसरत करत मार्ग काढत काढत पाण्यातून नदी पार करत आहेत. बार्शी तालुक्यातील साकत ते घाणेगाव गावाला गेल्या दोन वषार्पासून नदीवरील पुलाचे काम रखडल्यामुळे नागरिकांना पावसाळ्यात त्रास होत असतो.

## संपादकीय

# बेरोजगारीवर उपाय कधी?

बेरोजगारीच्या दरातील चढउतारांचे देशाच्या विकासावर दूरगामी परिणाम होतात. सध्याचा बेरोजगारीचा दर, बेरोजगारीमागील कारणे आणि त्याचे होणारे परिणाम याचा ऊहापोह करणारा लेख...
इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट 2024 नुसार, भारताची काम करणारी लोकसंख्या 2011 मध्ये 61 टक्क्यांवरून 2021 मध्ये 64 टक्क्यांपर्यंत वाढली आणि 2036 मध्ये ती 65 टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

तथापि, आर्थिक क्रियाकलापांमध्ये सहभागी असलेल्या तरुणांची टक्केवारी 2022 मध्ये 37 टक्क्यांपर्यंत घसरली. शाश्वत रोजगार वाढ आणि देशाच्या भविष्यातील समृद्धी सुरक्षित करण्यासाठी सतत दक्षता आणि प्रभावी धोरणात्मक उपाययोजना महत्त्वाच्या आहेत. मागील प्रक्रियेपेक्षा वेगळे पाऊल उचलत, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने आता मासिक कामगार डेटा अहवाल जारी करण्यास सुरुवात केली आहे, ज्यामध्ये शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांचा समावेश असेल.

पहिल्या मासिक नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण मधून असे दिसून आले आहे की एप्रिल 2025 मध्ये भारताचा बेरोजगारी दर 5.1 टक्के होता. हा आकडा स्वतंत्र थिंक टँक सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी ने मोजलेल्या 7.73 टक्के दरापेक्षा कमी आहे. दोन्हीसाठी पद्धती भिन्न असल्याने या आकड्यांची तुलना करता येत नाही. झडञ्रड ने एप्रिल 2025 मध्ये 7,511 पहिल्या टप्प्यातील नमुन्याचे युनिट्स विचारात घेतले.

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या 89,434 (ग्रामीण भागात 49,323 आणि शहरी भागात 40,111) होती आणि सर्वेक्षण केलेल्या व्यक्तींची संख्या 3,80,838 (ग्रामीण भागात 2,17,483 आणि शहरी भागात 1,63,355) होती. एमओएसपीआयच्या एका प्रसिद्धीपत्रकानुसार, ग्रामीण भागात, 15 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये एप्रिल 2025 मध्ये एकूण कामगार दल सहभाग दर (एलएफपीआर) 55.6 टक्के होता, तर शहरी भागात 50.7 टक्के होता.

कामगार मागणी आणि रोजगार दरांमधील हे बदलते ट्रेंड सध्याच्या आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपाययोजनांची आवश्यकता दर्शवितात. अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक लवचिकतेला बळकटी देण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व ते अधोरेखित करते. भूतकाळातील भारतातील बेरोजगारी दरावर परिणाम करणाया प्रमुख आर्थिक घटना आपल्या संपूर्ण आर्थिक इतिहासात, अनेक महत्त्वाच्या घटनांनी भारतातील बेरोजगारी दरावर लक्षणीय परिणाम केला आहे.

जागतिक आर्थिक संकट (2008-2009) : 2008 च्या जागतिक आर्थिक संकटाने भारताच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम केला, ज्यामुळे विकास मंदावला आणि विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी कमी झाल्या.

नोटाबंदी (2016) : 2016मध्ये उच्च-मूल्याच्या चलनी नोटा रद्द करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे आर्थिक अडथळे निर्माण झाले, विशेषतः अनौपचारिक क्षेत्रात, ज्यामुळे नोर्कया गेल्या.

वस्तू आणि सेवा कर (2017): जीएसटी लागू करण्याचा उद्देश कररचना सुलभ करणे होता, परंतु सुरुवातीला त्याचा अर्थव्यवस्थेत अल्पकालीन व्यत्यय आला, ज्यामुळे व्यवसाय आणि रोजगार प्रभावित झाले.

कोविड-19 महामारी (2020): कोविड आणि त्यानंतरच्या लॉकडाऊन उपायांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर खोलवर परिणाम झाला, ज्यामुळे व्यवसाय बंद पडल्याने बेरोजगारी वाढली.

महागाईचा दबाव : गेल्या काही वर्षांत भारताला महागाईच्या दबावाचा सामना करावा लागला आहे, ज्यामुळे भारतातील सध्याच्या बेरोजगारी दरावर परिणाम झाला आहे. उच्च महागाई दर ग्राहकांची क्रयशक्ती कमी करू शकतात, ज्यामुळे वस्तू आणि सेवांची मागणी कमी होऊ शकते. याचा व्यवसायांवर तीव्र परिणाम होऊ शकतो. परिणामी खर्च कमी करण्याचे उपाय केले जाऊ शकतात, ज्यामध्ये टाळेबंदी आणि नोकरभरती बंदचा समावेश आहे, त्यामुळे बेरोजगारीचा दर वाढतो.

भारतातील बेरोजगारीची कारणे

बेरोजगारी ही कामगार संख्येत घट झाल्यामुळे किंवा नोर्कयांच्या कमतरतेमुळे येते की ती तात्पुरती किंवा कायमची असेल हे ठरवते. बेरोजगारीचे चार प्रकार आहेत- संरचनात्मक, घर्षणात्मक, हंगामी आणि चक्रीय. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळेही बेरोजगारीत वाढ होते.

अकुशल मनुष्यबळ : कमी शिक्षण तसेच व्यावसायिक कौशल्य नसलेल्यांची संख्या मोठी आहे. नोटाबंदीनंतर कामगार-केंद्रित उद्योगांना खासगी गुंतवणुकीत मंदी आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादकता कमी असल्याने आणि कृषी कर्मचाऱ्यांसाठी पर्यायांच्या कमतरतेमुळे तीन क्षेत्रांमधील संक्रमण आव्हानात्मक आहे. कायदेशीर अडचणी, अपुरा सरकारी पाठिंबा आणि कमकुवत बाजारपेठ, आर्थिक आणि पायाभूत सुविधांशी असलेले संबंध खर्च आणि अनुपालनाच्या अतिरेकीमुळे त्या कामकाजांना फायदेशीर ठरत नाही.

उत्पादन क्षेत्रातील कमी गुंतवणूक, अपुरा पायाभूत सुविधांचा विकास यामुळे दुय्यम क्षेत्रातील नोकरीच्या संधी मर्यादित होतात. सरकार रोजगार स्थिरता निर्माण करण्यासाठी किमान वेतन पातळीवर पूर्णवेळ रोजगार निर्माण करणारा सार्वजनिक रोजगार कार्यक्रम उभारू शकते किंवा कामासाठी अन्न कार्यक्रमाचा भाग म्हणून बेरोजगार व्यक्तींना तात्पुरते कामगार देऊ शकते.

बेरोजगारीचे निर्धारक : कामगार दलात स्वयंरोजगार वाटा व बेरोजगारी दर यांच्यात नकारात्मक संबंध आहे, जो सूचित करतो की उच्च स्वयंरोजगार असलेल्या राज्यांमध्ये बहुतेकदा अनौपचारिक,बेरोजगारी दर कमी आहेत. शहरीकरण आणि शेतीचा परिणामः गोवा आणि केरळसारख्या उच्च शहरीकरण झालेल्या राज्यांमध्ये उच्च बेरोजगारी दिसून येते, तर उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश सारख्या मोठ्या ग्रामीण क्षेत्र असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारी दर कमी आहेत.

शिक्षण आणि रोजगारः केरळसारख्या उच्च शिक्षण पातळी असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारी जास्त आहे, तर गुजरात आणि महाराष्ट्रासारख्या कमी पदवीधर टक्केवारी असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारीचा दर कमी आहे. उच्च वेतनाच्या नोर्कया शोधणाऱ्या पदवीधरांमुळे, कौशल्यांमध्ये जुळत नसल्यामुळे किंवा नवीन पदवीधरांना सामावून घेण्यासाठी अपुरी आधुनिक क्षेत्रातील वाढ यामुळे ही तफावत असू शकते.

# दुसऱ्यांना नावे ठेवण्यापेक्षा स्वतः चांगले वागा...

आजकाल स्वतःच्या चुका तशाच ठेवून दुसऱ्यांना नावे ठेवणारी माणसे या पृथ्वीतलावर खूप वाढली आहेत. ही माणसे सार्वजनिक ठिकाणी चार माणसात गेल्यावर आपल्या ओंगळ वर्तनाचे प्रदर्शन करतात. म्हणजे स्वतः कसेही वागतात, कसेही बोलतात, कसेही राहतात, जणू यांच्यात कोणतेच माणुसकीचे गुणधर्म नाहीत. यांचे वर्तन म्हणजे निव्वळ रानटी पशु प्रमाणेच असते. पण ही माणसे दुसऱ्यांना नावे ठेवण्यात फार पटाईत असतात.स्वतःच्या गुणदोषांकडे दुर्लक्ष करून इतरांच्या चुका शोधत बसतात. स्वतःतील चुका दुरुस्त करायच्या सोडून दुसऱ्यांना नावे ठेवण्यात काय अर्थ? स्वतः कसेही मोकाट वागून मानवतेला अशोभनीय वर्तन करायचे, सैतानी दुष्कृत्य करायचे आणि दुसऱ्यांना चांगले रहा म्हणून सांगायचे, हे कसे चालणार? स्वतः माणुसकी हिन जीवन जगायचे, आणि दुसऱ्याला मानवतेचे धडे शिकवायचे, हे कितपत योग्य आहे?

या बाबींचा विचार करून प्रत्येकाने स्वतःचे आत्मपरीक्षण करायला हवे.असे मला वाटते. कारण हल्ली मानवतेचा वस्तूपाठ शिकवणारी माणसे जागोजागी पाहायला मिळत आहेत. या माणसांचा सुळसुळाट आता कमी न होता वाढतच आहे.बसने प्रवास करताना, समाजात व गावात वावरताना आणि शहरी भागात सैर करताना अशा नावे ठेवू लोकांचे दर्शन आपोआप घडते. ही माणसे दुसऱ्यांना कसे नावे ठेवतात? दुसऱ्यांबद्दल कसे बोलतात? हे बघायला व ऐकायला मिळते. या माणसांना वाटते की, आपण खूप पवित्र आहोत. बावनकशी सोन्यासारखे शुद्ध आहोत. आपल्यात कोणतेच गुणदोष नाहीत. म्हणून ते स्वतःचे आत्मपरीक्षण न करता दुसऱ्यांना खुशाल नावे ठेवतात. स्वतःच्या घरातील अंधार निस्तरायचा सोडून दुसऱ्यांच्या घराला नाहक नावे ठेवण्याचे काम करतात. त्यांना स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही पण लोकांच्या डोळ्यातील कुसळ मात्र नक्की दिसते. मी समाजात व गावात वावरत असताना काही माणसे असेही बघतोय की, जी माणसे घरातील वृद्ध आई-वडिलांना कधीच प्रेमाने बोलत नाहीत, त्यांना जीव लावत नाहीत, त्यांच्या भावनांची कदर करत नाहीत. त्यांना पत्नीचे ऐकून रोज टोमणे देतात, तीच माणसे बाहेर जाऊन लोकांना आई-वडिलांचे महत्त्व सांगतात. आई-वडिलांची काळजी घ्या, त्यांच्यासोबत नीट वागा, त्यांना जीव लावा, त्यांना वेळेवर जेवण द्या, असे लोकांना सांगतात. पण स्वतः कसे वागत आहोत, याकडे मात्र दुर्लक्ष करतात. मग असला शहाणपणा काय कामाचा? स्वतः आई-वडिलांना कसलेही घाण घाण बोलायचे आणि समाजाला आई-वडिलांचे महत्त्व सांगायचे, याला काय अर्थ हो? समाजाला सर्व माहित असते की, कोण आई-वडिलांची काळजी घेतोय आणि कोण घेत नाही. तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात सुद्धा अशी लोक पाहायला मिळतात. सामाजिक क्षेत्रात काम करणारे व स्वतःला समाजसेवक म्हणून घेणारे आणि ज्यांचे सामाजिक कार्य शून्य असणारे काही महाभाग, जो सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन प्रामाणिकपणे काम करतो, ज्याचे सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे, अशा कर्तृत्वान व कार्यतत्पर माणसाला हे महाभाग नावे ठेवतात. आणि स्वतः किती कर्तृत्ववान आहोत हे लोकांना दाखवून देतात. शैक्षणिक क्षेत्राचा विचार केला तर प्रत्येक शाळेत टंगळमंगळ करणारे, कामचुकार, व्यसनी व मनमानी शिक्षक असतात. ते विद्यार्थ्यांना अध्यापन तर नीट करतच नाहीत. वर्गात वेळेवर येत नाहीत. आणि विद्यार्थ्यांना कसेही शिकवून मोकळे होतात.असे कामचुकार शिक्षक प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, तळमळीने व जीव ओतून शिकवणाऱ्या कर्तृत्वान व आदर्श शिक्षकांना बिंधास्त नावे ठेवतात. त्यांना नाहक बदनाम करून त्यांची मानहानी करतात.हे मी विद्यार्थी दशेत असताना शाळेत व महाविद्यालयात अनुभवले आहे. आणि हेच शिक्षक दुसऱ्या कर्तव्यदक्ष सहकारी शिक्षकांना कर्तव्यपरायणता शिकवण्यात फार पटाईत असतात. विद्यार्थ्यांचे पालक भेटल्यावर त्यांना सांगतात की, मी विद्यार्थ्यांना जीव ओतून व जादा तासिका घेऊन शिकवण्याचे काम करतोय.शाळेसाठी माझे योगदान खूप मोठे आहे. मी विद्यार्थी प्रिय शिक्षक आहे. माझे शैक्षणिक व सामाजिक कार्य वाखाणण्याजोगे आहे. असे काहीपण खोटे बोलून पालकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी माझा पाठपुरावा करा म्हणून पालकांना तगादा लावतात. पुरस्कारासाठी राजकीय लोकांचे व विविध सामाजिक संघटकांचे पाय धरतात. पुरस्कार मिळावा म्हणून खूप धडपड करतात. आणि एकदाचा पुरस्कार मिळवतात. आणि तो पुरस्कार हातात घेतलेला फोटो विविध वर्तमानपत्रात आणि सोशल मीडियावर प्रसारित करतात. पण पालक आणि विद्यार्थी काय वेडे नसतात, त्यांना चांगले माहित असते की, कोणता शिक्षक चांगले अध्यापन करतोय आणि कोणता नाही. तेव्हा अशा लोकांना सांगावे वाटते की, बांधवांनो समाज काय वेडा नसतो, तुमचा ढोंगीपणा ऐकून तुम्हाला डोक्यावर घ्यायला. आणि तुमच्या टिचभर कायार्ची ढीगभर प्रशंसा करायला. समाजाला सर्व माहित असते की, कोण आई-वडिलांची काळजी घेतोय आणि कोण नाही घेत. कोणता शिक्षक प्रामाणिकपणे ज्ञानदान करतोय आणि कोणता कामचुकारपणा करतोय. हे आपण लोकांना सांगत बसायची काहीच गरज नाही. गावकरी बरोबर ओळखून घेतात. आणि चांगल्या माणसाला चांगलंच म्हणतात आणि वाईटाला वाईटच म्हणतात. अगोदर आपल्या वर्तनात योग्य असा बदल करून माणसासारखे नीट वागायला शिका, लोकांच्या घरावर बोट दाखवण्यापेक्षा अगोदर आपले घर तपासून पहा... दुसऱ्यांच्या आया बहिणींना नावे ठेवण्यापेक्षा आपल्या घरातील सदस्याला चांगले वागायला सांगा...म्हणजे स्वतः चांगले वागा आणि मग लोकांच्या चुका लोकांना दाखवून द्या. तेव्हा समाजही तुमच्या शब्दाला मान ठेवून तुम्हाला सलाम करेल...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर, मो.7498715661

## प्रबोधन

# आपले जे काम। तोच धर्म खरा

खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अपवि, ही ओळ ज्यावेळी लिहिली गेली, त्या वेळी जगात जे धर्म आहेत, त्यात आणखी एका धमार्ची भर पडली. आज जगभर अठरा-वीसच धर्म रूढ आहेत. पण साने गुरुजींचा मानवता धर्म, श्रीकृष्णांनी महाभारतात सांगितलेला आपद्धर्म, छत्रपती शिवरायांनी ज्याचं रक्षण करण्याची प्रतिज्ञा केली तो राष्ट्रधर्म, असे कितीतरी धर्म वरील रूढ धर्मात न बसताही धर्म या संज्ञेला पात्र आहेत आणि ते कर्तव्यवाचक धर्म आहेत. 'धारणात धर्म इत्याहू' अर्थात, जो सांभाळतो, पालनपोषण, रक्षण-अभिवृद्धी करतो तो धर्म, अशी धमार्ची जी व्याख्या आहे. ती रूढ धमार्ला लागू होत नाहीच. उलट, ती रूढ धर्म जनहितनाशक असल्याचंच सिद्ध करते. कारण रूढ हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी, जैन आदि धर्म व्यक्तीचं ऐहिक हित सांभाळू शकतात काय, ह्या प्रश्नाचं उत्तर फक्त आणि फक्त नकारार्थीच येऊ शकेल. उदाहरणार्थ, छत्रपती शिवराय हिंदूधर्मीय होते, म्हणूनच राज्याभिषेकासाठी त्यांना भट-भिक्षुकांची घरं भरण्यासाठी स्वराजाचा खजिना रीता करावा लागला. त्यानंतर राष्ट्राची आर्थिक घडी बसवू जाता जाता त्यांच्या आयुष्याचीच घडी बिघडून गेली. छत्रपती शाहूंना वेदोक्त प्रकरणाने ज्या मानसिक-शारीरिक यातना दिल्या, त्या पाहिल्या तर त्यांनी रूढ हिंदू धर्म त्यागला असता तर बरं झालं असतं, असं वाटतं. जगातील जी माणसं पराकोटीची धार्मिक आहेत, ती जे हाल सोसतात ते पाहिल्यावर जो माणसाला छळतो त्याचं नाव धर्म अशी धर्माची वेगळी व्याख्या करण्याची वेळ येते. म्हणूनच धर्माच्या मोहमयी जादूटोण्याच्या, अफूसारख्या गुंगीचा त्याग करण्याची हिंमत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे ज्यांच्यात नाही, त्यांनी धर्म शब्दाचा अर्थ आता तरी कर्तव्य म्हणून घ्यावा. उदाहरणार्थ, शिक्षकांनी 'शिक्षकीधर्म' मानावा आणि त्या धमार्ची आचारविचार परंपरा, निर्माण करावी. आवश्यक तेव्हा आणि त्याशिवाय शक्य असेल तेव्हा अध्यापन करावं, अध्यापनाशी संबंधित वाचन, रोहिदास चांभार, संत जनाबाई, सावता माळी, भक्त पुंडलीक, गोरा कुंभार, सारे कामात गुंतून सुखी समाधानी आयुष्याचा लाभ घेत, महात्मा बुद्धापासून सर्व कर्मवीर स्वीकृत कायार्लाच आपला नवा धर्म मानत.

रूढ धार्मिक शिकवणींचा त्याग करा आणि आपल्या स्वीकृत नोकरी, धंदा, व्यवसाय, काम, सेवा यांनाच आपला खरा धर्म मानून त्यासाठी जगा असा संदेश देताना एक विचारवंत म्हणतात, 'देवाधमार्ची बौद्धिक चिकित्सा करून ज्ञान-विज्ञानाचा विचार-आचार-व्यवहार म्हणजेच देवाधमार्चा आचार-विचार-व्यवहार हा सत्यशोधकी, सत्याग्रही, पुरोगामीपणाचा अर्थ सर्वांनी समजून घेतला पाहिजे. 'कर्तव्यवाचक धर्म हा गृहस्थधर्म, गृहिणीधर्म, मातृधर्म, पितृधर्म, पुत्रधर्म, कन्याधर्म, आचार्यधर्म, सेवाधर्म, क्रीडाधर्म, कलाधर्म, लेखनधर्म, क्षात्रधर्म, पतिव्रता-धर्म, पत्नीधर्म, चिंतन, मनन, लेखन हा शिक्षकांचा आचारधर्म मानावा. विद्यार्थ्यांचं सतत सान्निध्य, अध्ययन-कौशल्यप्राप्तीचं मापन, ही नैमित्यिक कार्ये, आणि आपापल्या विषयातील सूत्रे, व्याख्या, सिद्धान्त यांचं सतत पठण हीच त्यांची वेद-उपनिषदं, श्रुती-स्मृतीतुल्य बौद्धिक मानून चालावं, एवढ्या ज्ञानसाधनेत जर एखादा शिक्षक अध्यापकधर्मामध्ये गुरफटला, तर रूढ धर्मनिष्ठांहून त्याला ही नवी धर्मनिष्ठता क्षणोक्षणी मोक्ष, मुक्ती, मनःशक्ती, स्वातंत्र्य देऊन त्याचं ऐहिक जीवन धन्य धन्य करून टाकील, आपल्या स्वीकृत उद्योगात अर्थात, खऱ्या धर्मात संत कबीर गुरफटून जात, सजन कसाई, पतिधर्म, शेजारधर्म, आचारधर्म, विचारधर्म, संगोपनधर्म, शुश्रूषाधर्म, दानधर्म, दयाधर्म अशा अनेक नावांनी आपणांपुढे येतो. पण आपण त्याला धमार्चा दर्जा न देण्याची चूक करून स्वतःची फसवणूक जन्मभर करतो आणि रूढ कर्मकांडी धर्माच्या जंगलात वाट चुकून भ्रमिष्टपणे भ्रमण करीत आयुष्य मातीमोल करून टाकतो.

गृहस्थधर्म गृहस्थाला घराची काळजी घेण्याची सतत जाणीव करून देतो. गृहस्थधमर्मी माणूस घराच्या उन्नतीचा, ऊर्जितावस्थेच्या, सुखाचा, शांततेचा विचारच महत्त्वाचा मानतो. आपल्या कुटुंबियांच्या समाधानाशिवाय त्याला दुसरं काहीच प्रिय वाटत नाही. असा माणूस आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श पिता, आदर्श आजोबा मानला जातो. एका गृहस्थधर्माच्या पालनात केवढी प्रचंड शक्ती असते. असा आदर्श गृहस्थधर्मी माणूस रूढ धर्म, त्याचं कर्मकांड या साऱ्यांपासून खूप दूर असतो. असा माणूस हिंदूही नसतो, मुसलमानही नसतो, ख्रिश्चनही नसतो, शिखही नसतो, पारशीही नसतो, जैनही नसतो आणि बौद्धही नसतो. तो असतो फक्त गृहस्थधर्मी! हा कर्तव्यरूपी धर्मच राष्ट्राला सुखी भविष्यकाळ मिळवून देतो, रूढ धर्म नव्हे! म्हणूनच म्हणायचं-

आपले जे काम। तोच धर्म
खरा बाकीचे विसरा। सारे धर्म। १
शिक्षकाचा धर्म। अध्यापन हाच
अध्ययन हाच। विद्यार्थ्यांचा।।२
गृहस्थाचा धर्म। रक्षण घराचे तेच
गृहिणीचे। धर्मकार्य।। ३
कृषिकार्य हाच। धर्म किसानाचा
वारीचा दिडींचा। नव्हे धर्म ।।४
परिचारिकेचा। धर्म रुग्णसेवा
डॉक्टरचाही व्हावा। धर्म तोच।।५
देवता पूजन। किंवा तीर्थाटन
कर्तव्य सोडून। करी मूर्ख।।६
'स्वधर्मपालनी मरा'। सांगे कृष्ण
रूढधमार्हून। वेगळा जो। हिंदू, बौद्ध, जैन।
ख्रिश्चन हे सारे रूढीचे पसारे। हितघाती ।।८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# सोलापूर विद्यापीठात...

### अहिल्यादेवीच्या आदर्श समाजव्यवस्था व न्यायव्यवस्थेचे अनुकरण आजच्या पिढीने करावे -पालकमंत्री जयकुमार गोरे

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या शुभेच्छा देऊन विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकाचे काम 15 जुलैपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले. एक भव्य स्मारक येथे उभा राहत असून यातून सर्वानाच प्रेरणा मिळेल. अहिल्यादेवी होळकर यांचे काम संपूर्ण देशात आदर्शवत असे आहे. संपूर्ण देशात हिंदू मंदिरांचा त्यांनी जिर्णोद्धार केला. हिंदू संस्कृती जोपासण्याचे काम त्यांच्या हातून झाले. आज देशात त्यांच्या आदर्श विचारांचा व कायार्चा जागर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त सुरू आहे. अहिल्यादेवींच्या आदर्श समाजव्यवस्था, न्यायव्यवस्थेचे अनुकरण आजचा पिढीने केले पाहिजे. विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला आहे. रस्त्याचे कामही लवकरच पूर्ण होईल, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आदर्श विचार व कार्य डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. आज विद्यापीठाची विद्यार्थिनी भुवनेश्वर जाधव हिने कराटे स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवर कांस्यपदक पटकाविले. 154 हून अधिक कौशल्य विकासाचे कोर्सेस विद्यापीठात सुरू आहेत. त्याचबरोबर पंढरपुरात आंतरराष्ट्रीय वारकरी संशोधन केंद्र सुरू करण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तृतीयपंथी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा केंद्र देखील सुरू करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.. यासाठी शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा कुलगुरु प्रा. महानवर यांनी यावेळी व्यक्त केली.

महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे प्रशासकीय कार्य लोकाभिमुख होते, असे सांगून प्रशासनात आजही त्यांच्या कायार्चा पगडा आहे, असे सांगितले. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, सिनेट सदस्य तथा भाजपच्या शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, मोहन डांगरे, सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, गणेश डोंगरे, यतीराज होनमाने, अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे सदस्य अमोल कारंडे, माऊली हळणवर यांच्यासह विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, विद्यापीठ अभियंता गिरीश कुलकर्णी, विविध प्राधिकरणाचे सदस्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले.

# अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये अत्याधुनिक अग्निशमन वाहने उपलब्ध करून देणार - पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासन व प्रशासन हे कारखानदार, कामगार तसेच उद्योगाच्या विकासासाठी नेहमीच सहकार्याच्या भूमिकेत आहे. अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये नुकतीच झालेली दुर्घटना पुन्हा होऊ नये यासाठी एमआयडीसीमध्ये रस्ते, पाणी, वीज या सुविधा बरोबरच अत्याधुनिक अग्निशामक वाहने लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित अक्कलकोट एमआयडीसी मध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्घटने संदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक नगर रचना संचालक मनीष भिष्णूरकर, कार्यकारी अभियंता तपन डंके, स्मार्ट सिटी चे तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे, टकऊ विभागीय अधिकारी शिवाजी राठोड, अग्निशमन अधिकारी दिनेश अंभोरे, महापालिकेचे अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे, श्रीमती रोहिणी तडवळकर, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, पेंटप्पा गडडम अध्यक्ष सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ अध्यक्ष पॅन्टपा गड्डम, मल्लिकार्जुन कमटम, अंबादास बिंगी, नारायण आडकी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, एमआयडीसी मध्ये रस्ते लहान असल्याचे निर्देशनास आलेले आहे, त्यावर काही ठिकाणी अतिक्रमने झालेले असून ती अतिक्रमणे काढून टाकणं, रस्ते रुंदीकरण करणे तसेच या ठिकाणी पाच लाख लिटर पाणी साठवण क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. महापालिकेला अत्याधुनिक अग्निशमन वाहने घेण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करण्यात येईल. शासन व प्रशासन उद्योग वाढीबरोबरच उद्योग व तेथे काम करणारे कामगाराच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रयत्न करतच आहे परंतु या भागातील कारखानदारांनी ही तेवढे सहकार्य देणे आवश्यक असून नियमानुसार सर्व सुविधा कारखान्यात उपलब्ध ठेवणे ही आवश्यक असल्याचे त्यांनी सुचित केले.

तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महापालिका, अग्निशमन दल, पोलीस विभाग तसेच संबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी या दुर्घटनेच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल पुढील आठ दिवसात द्यावा. हा वॉल प्राप्त झाल्यानंतर दुर्घटनेचे कारणे समोर येतील तसेच आग विझवताना आलेल्या अडचणी तसेच वॉटर फीडिंग ची व्यवस्था व अशा दुर्घटना पुन्हा होऊ नयेत या दृष्टीने पुढील काळात काटेकोरपणे नियोजन करणे शक्य होणार असल्याची माहिती पालकमंत्री श्रीगोरे यांनी दिली.

बांधकाम विभाग आणि अग्निशमन दलांना या घटनेसंदर्भात कोणाला नोटीस दिल्या आहेत, याची विचारणा करण्यात आली. कारखान्यांमध्ये अनधिकृत बांधकामे, कायद्याचे उल्लंघन, खबरदारीच्या उपायांचा अभाव आणि आवश्यक साहित्याची अनुपलब्धता यावर पालकमंत्री गोरे यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. तसेच कारखान्यांमध्येच प्रार्थना स्थळे असणे आणि कामगारांना तिथेच राहण्याची सोय करणे या बाबी नियमांना धरून नाहीत तरी कारखानदारांनीही नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

एमआयडीसीमध्ये मुबलक पाण्याची सोय नसल्याने विविध समस्या भेडसावत असल्याचे उद्योग असोसिएशनने निदर्शनास आणले. एमआयडीसी मधील विविध सोयी सुविधा तसेच मुबलक पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री महोदय तसेच उद्योग मंत्री महोदय यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल, असे श्री. गोरे यांनी सांगितले.

शहरात होणाऱ्या उड्डाणपुलावरती नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. शासनाकडून ज्यांना जागा नाही, घर नाही अशा लोकांचाही सर्व्हे केला जाईल व त्यांना शासकीय जमिनीवरती घरेही लवकरच मिळवून देण्याचा शासनाचा ध्यास असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांनी नुकत्याच एम आय डी सी मध्ये घडलेल्या दुर्घटनेचे अनुषंगाने पालकमंत्री महोदय यांना माहिती दिली.

**महापालिकेचा सर्वेक्षण अहवाल**

महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी सादर केलेल्या अहवालात अग्निशमन दलाला आग विझवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याचे नमूद केले. अनधिकृत बांधकामांमुळे अग्निशमन दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचणे आणि प्रभावीपणे कार्य करणे अशक्य झाले. महानगरपालिकेच्या 9 सदस्यीय पथकाने केलेल्या सर्वेक्षणानुसार, प्रत्येक पथकात अग्निशमन विभाग, नगर रचना विभाग व कर विभागाचे अधिकारी सहभाग एकूण ९३२ मालमत्ताची पाहणी ५७ ठिकाणी अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली ७३७ मालमत्तांमध्ये सामासिक अंतरामध्ये बांधकाम, गोडाऊन, शेड, बोईलर मशीनसाठी वापर असल्याचे दिसून आले.२१५ ठिकाणी रहिवास व औद्योगिक वापर होत असल्याचे दिसून आले.४५८ इमारतींमध्ये कोणत्याही प्रकारची अग्निशमन व्यवस्था उभारली गेली नसल्याचे निदर्शनास आलेकेवळ २७ इमारतीमध्ये अग्निशमन व्यवस्था.. ४४७ ठिकाणी अर्धवट किंवा केवळ दिसण्या पूर्ती अग्निशमन व्यवस्था..६७ ठिकाणी लोक अनधिकृतपणे निवासी वापर करत असल्याचे दिसून आले. असल्याचेही या अहवालातून समोर आले आहे.

## वात्रटिका

### कसली खळबळ

एक गट त्या पक्षात
तो पक्ष दुसऱ्या पक्षात...
कोण कुठे घुसला ते
येणार नाही लक्षात...
रोजच कोणाचीतरी
सुरू असते चुळबुळ...
कोणाल कांहीच वाटत नाही
तरीही मिडिया म्हणते खळबळ...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# शिवसृष्टीबाहेरील सूचना...

केल्यानंतर संबंधितांनी आपली ओळख सांगितली.

हा सर्व प्रकार फिर्यादीसोबत असलेल्या एकाने आपल्या मोबाईलमध्ये चित्रित केला. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. भारती विद्यापीठ पोलिसांनी अमोल कुलकर्णी यांच्यासह पत्नीला अटक केली.

अमोल हे दारूच्या नशेत असल्याची प्राथमिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी दाम्पत्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, भारती विद्यापीठ पोलिस पुढील तपास करीत आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन संपन्न




**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिवस वैचारिक जनजागृतीद्वारे संपन्न झाला. जागतिक आरोग्य संघटना आणि सर्व भागीदार देश दरवर्षी हा जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा करतात. याचा मुख्य उद्देश तंबाखूच्या वापराशी संबंधित आरोग्य धोके अधोरेखित करणे आणि तंबाखूचे सेवन कमी करण्यासाठी प्रभावी धोरणांचा पुरस्कार करणे असा आहे. तंबाखूचा वापर हे जागतिक स्तरावर मृत्यूचे सर्वात प्रतिबंधात्मक कारण आहे आणि सध्या जगभरातील १० पैकी एका प्रौढ व्यक्तीच्या मृत्यूसाठी जबाबदार आहे. पर्यावरणावर तंबाखू उद्योगाचा हानिकारक परिणाम प्रचंड आणि वाढत आहे. तंबाखू दरवर्षी ८ दशलक्षाहून अधिक लोकांचा मृत्यू करतो आणि आपल्या पर्यावरणाचा नाश करतो, लागवड, उत्पादन, वितरण, वापर आणि ग्राहकानंतरच्या कचऱ्याद्वारे मानवी आरोग्याला आणखी हानी देखील पोहोचवते. विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालय शिक्षण घेत असताना याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी विस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा कुदळे यांनी तंबाखूजन्य पदार्थांचे मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारे परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नवनाथ गोसावी यांनी देखील विद्यार्थ्यांना व्यसनांपासून अलिप्त राहून सुखी व निरोगी आयुष्य जगण्याचा मौलिक सल्ला दिला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अजित कुरे यांनी चित्रफितीच्या माध्यमातून जागतिक आरोग्य संघटनेची तंबाखू विरोधी दिनानिमित्त असलेली भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनी व्यसनाधीनते मुळे होणारे भविष्यातील धोके ओळखून आणि आरोग्य हीच धनसंपत्ती आहे हे जानुन व्यसनापासून परावृत्त व्हावे आणि एक सुजाण नागरिक आपले जीवन व्यतीत करावे असा विचार त्यांनी मांडला.

सदरील कार्यक्रमाच्या आयोजन व संपन्नतेसाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचा शेवट प्रा. अजित कुरे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. या जनजागृती कार्यक्रमाकरिता प्रा. मीनाक्षी नाईकनवरे, प्रा. कल्पना मिटकरी, प्रा. सुकन्या जाधव, डॉ. विजयारणी दावणे, प्रा. अजिंक्य ढोरे, प्रा. अभिजीत नारायणकर आणि प्रथम वर्षातील विद्यार्थी विद्यार्थिनीची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# मंगळवेढ्यातील 35 गावचा पाणीप्रश्न माझ्यासाठी जिव्हाळ्याचा- खा. प्रणिती शिंदे

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवेढा तालुक्यातील सलगर बुद्रुक आणि लवंगी या गावी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच ग्रामस्थांचे निवेदने ही स्वीकारून त्यांच्या अडचणी लवकरात लवकर सोडविण्याची ग्वाही दिली. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाले की, म्हणाले मंगळवेढा तालुक्यातील ३५ गावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा असून खाजगी संस्थेमार्फत काम सुरू केले आहे. लवकरच ३५ गावचा पाण्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी माझ्याकडून प्रयत्न सुरू आहे.



म्हैसाळ पाणीपुरवठा योजनेचे पाणी सलगर बुद्रुक व लवंगी परिसरामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट तातडीने पंचनामे करण्याचे आदेश खासदार प्रणिती शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष रविकरण कोळेकर, सलगर बुद्रुक चे सरपंच कदम साहेब, डॉक्टर अंकुश कांबळे सर, बसवराज धायगोंडे, चंद्रकांत पाटील व इतर ग्रामस्थ तसेच लवंगी गावचे सरपंच ओवाळे ताई, राहुल कांबळे, पिंटू खडतरे, तानाजी पवार, भारत निकम, शिवाजी चव्हाण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'भोगावती'च्या पाण्यात वाढ

**मोहोळ(कटूसत्य वृत्त):-** मान्सूनचे मोहोळ तालुक्यात जोरदार आगमन झाले असून, रात्री दहा ते पहाटे दीड वाजण्याच्या दरम्यान मोहोळ तालुक्यातील नरखेड मंडलात सुमारे चार तास जोरदार वारा – विजांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. नरखेड मंडलातील पर्जन्यमापकात ४२ मिमी पावसाची नोंद झाली. या पावसामुळे भोगावती व नागझरी नद्यांना पूरस्थिती निर्माण झाली. अनेक पिके

**पाण्याखाली गेले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.**

संपूर्ण महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात पावसाने कहर केला असून जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी आभाळ फाटल्यासारखा पाऊस पडला आहे. शेजारील नगर जिल्ह्यात तसेच धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, बार्शी, माढा तालुक्यात गेल्या दोन–तीन दिवसांपासून पडत असलेल्या



पावसामुळे मोहोळ तालुक्यातील सीना, भोगावती, नागझरी या नद्यांना पूरस्थिती निर्माण झाली आहे. यावर्षी पावसाने गेल्या १०७ वर्षांचे रेकॉर्ड मोडले आहे.

जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. सोलापूरच्या इतिहासात मे महिन्यातील रेकॉर्डब्रेक पावसाची नोंद झाली आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका शेतीला बसला आहे. नदी–नाल्यांना पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पंचनाम्याची मागणी जोर धरत आहे.

वस्त्यांचा गावाशी संपर्क तुटला मोहोळ तालुक्यातील वाळुज कळमण रस्त्यावर भोगावती नदीवर पूल नसल्यामुळे वाळुज शिवारातील शेतीचे या नदीमुळे दोन भाग पडले आहेत. नदीच्या पुरामुळे शेतात जाण्या– येण्यास अडथळा निर्माण होत असल्याने वाळुजच्या नदीपलीकडील शेतकऱ्यांची जाधव वस्ती वसली आहे. मात्र नदीवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात या वस्तीचा गावाशी संपर्क तुटतो. सध्याही तीच परिस्थिती आहे. लोकांना जाण्या–येण्यासाठी पोहून नदी पार करावी लागते तर विद्यार्थ्यांना होडीतून किंवा पाण्यातून पोहन जावे लागते. पावसाळ्यात नदीला अचानक आलेल्या पुराच्या पाण्यात नदीकाठच्या शेतातील वस्तीवर बांधलेली जनावरे, पिके वाहून गेल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. मात्र प्रशासनाला अद्यापही जाग आलेली नाही.

# मातोश्री वच्छला गायकवाड यांच्या 61 व्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ गायकवाड यांच्या मातोश्री वत्सलाबाई श्रीधर गायकवाड यांचा 61 वा वाढदिवस छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करत मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड तसेच शिव मावळा संघटन यांच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज पुतळा परिसर येथे मोठ्या उत्साहात विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यामध्ये प्रार्थना फाउंडेशन च्या अनाथ व निराधार ५० शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आल्या त्याच बरोबर श्रद्धा प्रवीण माने, विराज संभाजी साळुंखे, पोपट वाळसंगे, महबूब शेख, स्वराज सचिन साळुंखे, केतन किशोर धुळे, देवराज श्रीशैल विभुते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर शिवश्री लहू गायकवाड यांची पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ बाळासाहेब ठाकरे अध्यापन केंद्र संचालक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव प्राध्यापक लक्ष्मण महाडिक सर व वधू वर कक्षाचे जिल्हाध्यक्ष अंबादास



सपकाळे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मराठा सेवा संघ 33 कक्ष शिव मावळा संघटन त्याचबरोबर विश्वनाथ गायकवाड यांचा मित्रपरिवार उपस्थित होता.

प्रार्थना फाउंडेशन चे प्रसाद मोहिते यांनी विश्वनाथ गायकवाड यांच्या मातोश्रीं ना शुभेच्छा देत. सामाजिक बांधिलकी हरवत चाली असताना अनाथ मुलांना जो मदतीचा हात दिला त्याबद्दल त्यांचे कौतुक केले यावेळी कार्यक्रमासाठी सदाशिव पवार, लक्ष्मण महाडिक, उज्वला ताई साळुंखे, अभीजलीताई जाधव, लता ताई ढेरे,जीवन यादव, लिंबराज जाधव, सोमनाथ राऊत, ब्रह्मदेव पवार 'शिवाजी निळ, कल्याण गव्हाणे, लहू गायकवाड राम माने, सचिन चव्हाण, नितीन मोहिते, सुनील साळुंखे. गोवर्धन गुंड, अंबादास सपकाळ, रमेश अण्णा जाधव, दत्ता पैलवान जाधव, प्रकाश डोंगरे, राजू व्यवहारे, राजेंद्र भोसले, श्रीनिवास सावंत, विवेकानंद सावंत, बिराजदार, राहुल जाधव, अथर्व यादव यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, लिंबराज जाधव सर, सचिन चव्हाण, सदाशिव पवार, कल्याण गव्हाणे यांनी परिश्रम घेतले.

# बाळकृष्ण जयवंत दाते प्रशालेच्या मुख्याध्यापक पदी विनायक देशपांडे यांची नियुक्ती



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** येथील नातेपुते एज्युकेशन सोसायटी संचलित बाळकृष्ण जयवंत दाते प्रशालेच्या मुख्याध्यापक पदी विनायक देशपांडे यांची नियुक्ती झाली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे मार्गदर्शक सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, चेअरमन बाहूबली चंकेश्वरा, व्हा.चेअरमन संतोष काळे,सेक्रेटरी ॲड.शिवाजीराव पिसाळ, यांनी नूतन मुख्याध्यापक विनायक देशपांडे यांचे अभिनंदन केले.

यावेळी माजी मुख्याध्यापक विठ्ठल पिसे, उपप्राचार्य भारत पांढरे, मुख्य लिपिक आबासाहेब देवकाते, पर्यवेक्षक नवनाथ बांगर, संजय नाळे, संजय पवार, अभिजित म्हामणे, हनुमंत बनसोडे वरीष्ठ लिपिक रवि ननवरे, खंडू चांगण, महावीर लांडगे, अर्जुन आदि उपस्थित होते.

# चिंचोलीत गुन्हेगारीच्या दोन घटना

## महिलेवर सामुहिक बलात्कर केल्यासह जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे परस्पर विरोधी गुन्हे दाखल

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील चिंचोली गावात गुन्हेगारीच्या दोन घटना घडल्या आहेत.महिलेवर सामुहीक बलात्कारासह जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे परस्पर विरोधी माढा पोलिसांत गुन्हे दाखल झाले आहेत.एकुण ११ जणाविरुध्द गुन्हे दाखल झाले आहेत.

२५ वर्षीय पिडीत महिलेने माढा पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन राजकुमार महादेव लोंढे, दिनेश भिकाजी लोंढे,रोहन दिनेश लोंढे, अन्य अनोळखी गाडीचा चालक अश्या चार जणाविरुध्द सामुहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची घटना 19 मे सकाळी १०.३० च्या सुमारास चिंचोली येथील नंदींबाच्या जंगलातील लवणात 100 मिटर अंतरावर घडली.

१९ मे रोजी सकाळी १० वा.च्या सुमारास चिंचोली येथील नंदीबाच्या जंगलातील वळणाजवळ संबधित चौघा आरोपीनी फिर्यादी महिलेच्या तोंडात रुमालाचा बोळा करुन घातला व राजकुमार लोंढे यांचेसह इतर तिघांनी फियार्दीचे इच्छेविरुद्ध शरिर संबंध करुन त्यांनी गाडीमध्ये बसवलेनंतर तलवारी व सतुरांचा धाक दाखवुन कोणाला काही सांगितले तर तुला व तुज्या नवऱ्याचा काटा काढीन अशी धमकी दिली.

त्यानंतर रोहन दिनेश लोंढे हा तेथे आला व त्याने तु जर माज्या वडिलांविषयी काही तक्रार करशील तर तुज्या घराबाराला जिवे ठार मारीन अशी धमकी देऊन गेल्याची फियार्दीत संबधित पिडीत महिलेने नमुद केले आहे.

तर दुसऱ्या तक्रारीत गावच्या राजकारणाल अडथळा आणतो याचा राग मनात धरुन राजकुमार महादेव लोंढे यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची फिर्याद राजकुमार लोंढे यांनी दिल्यानुसार बाजीराव सुभाष लोंढे, अनिल सुभाष लोंढे, केशव सावता देवकर, आदित्य दशरथ चव्हाण, प्रतिक गायकवाड, अमोल धनाजी लोंढे सर्व रा. चिंचोली ता. माढा या सात जणाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.19 मे रोजी सायंकाळी ८ च्या सुमारास चिंचोली गावच्या शिवारात आर डी एल कंपनीच्या समोर घडली.

लोखंडी पाईप, लोखंडी रॉड, हॉकी स्टीक, एस टी पाईप, लोंखडी चैन, तलवार, कोयता या हत्याराने राजकुमार लोंढे आर डी एल कंपनीच्या समोर थांबला असताना संबधित ७ आरोपीनी जिवे मारण्याच्या उद्देशाने एकत्र मोटार सायकलवरुन लोंढे यांच्या जवळ जवळ येवून त्यांचेतील बाजीराव लोंढे हा फियार्दीचे जवळ येवून तुला लय माज आला आहे, तुला लय गुर्मी आली आहे, तु मंत्रालयात जातो गावच्या राजकारणात अडथळा आणतो काय असे म्हणून तुला आज जिवंत ठेवायचे नाही असे म्हणून शिवीगाळी दमदाटी करून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हत्याराने जबर मारहाण करुन गंभीर जखमी करुन संबधित आरोपी पळून निघून गेले.

दोन्ही घटनांचा तपास माढा पोलिस स्टेशनचे स.पो.नी.नेताजी बंडगर करीत आहेत.या दोन्ही घटनांमधील सखोल सत्य समोर येण्याची गरज आहे.तो पोलिस तपासातून येणार का? हाच खरा प्रश्न आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुर्वणसंधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Service (CDS) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक 16 जून 2025 ते 29 ऑगस्ट 2025 या कालावधीत उक्त कोर्स क्र. 65 आयोजित करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीर्ना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. तरी सोलापूर जिल्हयातील इच्छुक उमेद्वारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दिनांक 12 जून 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट वर सर्च करुन त्यामधील CDS-65 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावे. सदर सी.डी.एस. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील नमुद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत :-

उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार संघ लोकसेवा आयोग (UPSC) नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणा–या सी.डी.एस. (CDS) या परिक्षेकरिता ऑनलाईन व्दारे अर्ज केलेला असावा.

# पर्यावरणस्नेहींनी बनवले हजारो सीडबॉल

## पर्यावरण दिनानिमित्त महापालिका पर्यावरण विभाग आणि इको फ्रेंडली क्लबचा उपक्रम

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लहान मुले, पालक, महाविद्यालयीन तरुणाई आणि ज्येष्ठ नागरिकांनी सीड बॉल बनविण्याच्या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. पर्यावरण दिनानिमित्त माझी वसुंधरा अभियान



अंतर्गत सोलापूर महानगरपालिका पर्यावरण विभाग आणि इको फ्रेंडली क्लब यांच्यावतीने डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक येथे सीड बॉल (बीज गोळे) बनवण्याचा उपक्रम आयोजित केला होता.

सुरुवातीला काळी माती एकजीव करण्यात आली. त्यात देशी झाडांच्या बिया घालून बॉलसारखे छोटे गोळे तयार करण्यात आले. वसुंधरा मित्र, इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक परशुराम कोकणे यांनी सीड बॉल बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले.

वाळलेले सीड बॉल सायकलिंग, निसर्ग भ्रमंती, ट्रेकींग आणि सहलीदरम्यान टाकण्यात येणार आहेत. हे सीड बॉल फुटून बियांना अंकुर येईल आणि त्या रोपांचे झाडात रुपांतर होईल, अशी ही संकल्पना आहे.


दोन तासात हजारो सीड बॉल बनवण्यात आले. सोलापूर महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, उद्यान विभागातील कर्मचारी दिलीप भामरे, मच्छिंद्र गेजगे, वैष्णव दांडगे यांनी सीड बॉल कार्यशाळेत सहभाग नोंदवून पर्यावरणप्रेमींना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमात इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक अजित कोकणे, सदस्य संजय टोळे, दर्शन जाधव, सुरेश नारायणकर, गंगुबाई कोकणे, आराध्या कोकणे, ड. साधना काकडे, डॉ. मधुरा बुरटे, शैलजा घाटे, डॉ. हर्षदा आगलावे, स्नेहा क्षीरसागर, अस्मय क्षीरसागर, शुभदा कडगावकर, सरस्वती कोकणे, पूजा कोकणे, धनंजय कांबळे, शशिकला कांबळे, अर्चना जमादार, रश्मी पात्रुडकर, सर्वेश गावंडे, रणजीत होले पाटील, पर्यावरणप्रेमी संतोष धाकपाडे, वीरभद्र स्वामी, वैष्णव दांडगे, राजकुमार कोळी, भारतीय डाक विभागातील श्रीरंग रेगोटी, वैद्य प्रवीण बिरगे, साची माळी, इरा नारायणकर, राई नारायणकर, वीर नारायणकर, विश्वराज कोळी, सृष्टी कोळी, विजयालक्ष्मी कोळी, व्यंकटेश यांच्यासह विविध क्षेत्रातील निसर्गप्रेमी उपस्थित होते.

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :**
१) बॉलीवूडचा महानायक
२) जवळ
३) शर्टवरील अंगरखा
४) शंभू महादेवाचा वार
५) पूर्ण शुध्द असे सोने
६) मुस्लीम बांधवांचा एक सण
८) तानाजी मालुसरे यांच्या मुलाचे नाव
१०) नगरपालिकेत निवडून दिलेला
१२) पलीकडे, पल्याड १३) मनावरील बोझा, दबाव
१४) सैन्याचा मुक्काम, बूड, खालचा भाग १६) सोने
१८) नरक
१९) पवित्र मनाने देणे , ** करणे
२१) मिठाची चव
२३) अवजड
२४) दागिना, ठपका
२५) कुटील हेतू
२६) माशाचा एक प्रकार
२८) खिडकीचे काचेचे बाहेरील आवरण
३०) कपाळभर लावलेले कुंकू
३३) आकाश
३४) फळातील गोड द्रव, ज्यूस
३५) सज्जन मनुष्य
३७) मानसिक केलेला छळ

**आडवे शब्द :** १) छ. संभाजीराजांची भूमिका साकारणारा अभिनेता, शिरूरचे राष्ट्रवादीचे खासदार
४) छ. शिवरायांची दुसरी पत्नी ७) व्यक्तींचा समूह, विभाग
८) दशरथपुत्र ९) तोंड, मुख
११) मांत्रिक गळ्यात घालतात तो
१२) पायी जाणारा मार्ग
१३) राजाचा सभामंडप १४) नशीब (हिंदीत)
१५) वायफळ बोलणे १६) छोटा हंडा १७) प्रार्थनेदरम्यान म्हणतात ते २०) गाव करील ते ** काय करील २१) ** तशी माती
२२) मनातील ओळखणारा २५) हात २६) उत्तीर्ण २७) विश्व
२८) रागीट २९) मेडल ३०) ** वसे ते स्वप्नी दिसे ३१) दरारा, दबदबा
३२) छ. शिवरायांविषयी आक्षेपार्ह लेखन करणारा विदेशी लेखक - जेम्स **
३३) गोंधळ ३४) आडातून पाणी काढण्यासाठी पूर्वी वापरला जाणारा लाकडी गोलाकार ३५) समुद्र ३६) बेरीजच्या विरूध्दार्थी
३८) देवाजवळ बोलतात तो, देवाला घातलेले मागणे ३९) श्रावण (हिंदीत) ४०) स्पर्श (इंग्रजीत).

## सुडोकु - 264

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 8 | 3 | | 1 | 5 | 7 |
| 5 | | 3 | 1 | | 6 | 2 | 8 | |
| 1 | | | 7 | 4 | | | 9 | |
| | | | | 5 | | 8 | 3 | |
| 3 | | 1 | | | 4 | 6 | 7 | 2 |
| 2 | | | | 1 | 3 | | | 9 |
| | | 2 | | 7 | | | 1 | |
| | | | | | | | 6 | |
| | 3 | 4 | | 6 | | 9 | 2 | |

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यकारभाराने प्रजाहित दक्षतेचा आदर्श घालून दिला - पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जात, पात, धर्म, पंथ, प्रांतांच्या सीमा ओलांडून संपूर्ण देशात सामाजिक कार्य पार पाडण्यात आपलं संपूर्ण आयुष्य वेचणा ्या तसंच देशभर रस्ते, देऊळ, विहिरी, तलाव, नदीघाट, धर्मशाळेसारख्या सुविधा निर्माण करून लोकोपयोगी कामांना कायम प्राधान्य देणा ्या प्रजाहीतदक्ष राज्यकर्त्या, कर्तृत्ववान तसेच कार्यक्षम शासनकर्त्या, राष्ट्रनिर्मात्या, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने माजी नगरसेविका नुतन गायकवाड यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



या अभिवादन कार्यक्रमा प्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव जेष्ठ नेते श्रीनिवास कोंडी हेमंत चौधरी जनरल सेक्रटरी प्रमोद भोसले माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव युवती अध्यक्ष किरण माशाळकर ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सलिम नदाफ अल्पसंख्यांक राष्ट्रीय सचिव फारूक मटके अल्पसंख्यांक अध्यक्ष अमीर शेख सहकार अध्यक्ष भास्कर आडकी चित्रपट सांस्कृतिक सेल अध्यक्ष अशितोष नाटकर सोशल मिडीया अध्यक्ष वैभव गंगणे ओबीसी अध्यक्ष अनिल छत्रबंद ओबीसी कार्याध्यक्ष अय्युब शेख वैद्यकीय मदत कक्ष बसवराज कोळी रिक्षा चालक मालक सेल महपती पवार सेक्रेटरी दत्तात्रय बनसोडे प्रज्ञासागर गायकवाड सुरेखाताई घाडगे कविता पाटील संजय पाटील यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्रबाईटत्र जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांनी आपल्या मनोगतात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जनता सुखी, समाधानी व सुरक्षित रहावी, सामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी राज्यकारभार केला. अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार हा प्रेरणा देणारा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यकारभाराने प्रजाहितदक्षतेचा आदर्श घालून दिला आहे. त्यांनी स्त्रीशिक्षण, हुंडाबंदी, पर्यावरण रक्षण असे सुधारणावादी तसेच ग्रामविकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या योजना, प्रकल्प जाणीवपूर्वक राबविले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी चोंडी ता. जामखेड जिल्हा अहमदनगर येथे झाला. प्रजेच्या सुखासाठी अहिल्यादेवींनी दानधर्माच्या माध्यमातून अनेक चांगली कामे केली. जी आजही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देत उभी आहेत. त्यांनी प्रजाहितदक्षतेचा प्रेरणादायी वारसा आपल्याला दिला आहे. नदीचे घाट, वाटसरूंसाठीच्या धर्मशाळा, मंदिरां पुण्यश्लोक ची उभारणी त्यांचा जिर्णोद्धार अशा अनेक गोष्टी आजही त्यांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष देत उभ्या आहेत. अशा शौर्य, धैर्य, न्यायाच्या मुतीर्रूप अहिल्यादेवींना कोटी कोटी प्रणाम अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# तेरा दिवसांपासून भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे आंदोलन; शेतकऱ्यांचे होताहेत हाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटना पुणे विभागाच्या वतीने सुधारित तांत्रिक वेतनश्रेणीसाठी बेमुदत काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे १५ मे पासून हे आंदोलन सुरु आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थिती माघार नाही, अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.



या कार्यालयात शुकशुकाट आहे. कामासाठी आलेल्या नागरिकांना माघारी जावं लागत आहे. या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे हाल होत असल्याचे दिसून येत आहे.

एरवी नागरिकांच्या गर्दीनं भरलेलं हे कार्यालय आंदोलनामुळं ओस पडल्याचं दिसून आलं इकडे क्रर्मचारी वर्ग आंदोलन स्थळी ठाम आहे रास्त मागण्यासाठी लोकशाही मार्गानं आम्ही आंदोलन करत आहोत आम्हाला न्याय मिळाला पाहिजे अशी भावना व्यक्त करण्यात आली. भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनाच आंदोलन हे आता चिघळत चाललेलं असून कामकाज प्रभावित झाल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. यावर तोडगा निघावा अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने उत्कृष्ट काम : दिलीपं स्वामी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांचे चिरंजीव जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे नातू अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने अन्नदान सेवेबरोबरच धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक अशा क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्यात येत आहे, असे गौरवोद्गार छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीपराव स्वामी यांनी व्यक्त केले. छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी पदाचा दिलीप स्वामी यांनी नुकताच पदभार स्वीकारले. जन्मेजयराजे भोसले हे विविध कार्यक्रमानिमित्त जालना, छत्रपती संभाजीनगरच्या



दौऱ्यावर होते. छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची भेट घेऊन न्यासाच्या वतीने श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी दिलीपराव स्वामी बोलत होते. याप्रसंगी संतोष भोसले, लाला राठोड, रोहन शिर्के, रोहित खोबरे, अश्पाक काझी, शिवराज स्वामी, प्रशांत शिंदे, स्वामिनाथ गुरव, रमेश हळसंगी, संतोष माने उपस्थित होते.

# शहराचा पाणीपुरवठा राहणार आणखी एक आठवडा विस्कळीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराला पाणीपुरवठा करणारी टाकळी ते सोरेगांव दरम्यानची मुख्य ४८ इंची पाईपलाईनला वडकबाळ नॅशनल हायवेलगत गळती लागल्याने त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. शहराचा पाणीपुरवठा एका रोटेशनसाठी पुन्हा एक दिवस उशिरा होणार आहे. यामुळे शहराचा पाणीपुरवठा आणखी एक आठवडाभर विस्कळीतच राहणार आहे.



गळती दुरुस्तीचे काम शनिवार, ३१ मे रोजी सकाळी ८ वाजता हाती घेण्यात येणार आहे. दुरुस्तीच्या कामास बराच कालावधी लागणार असल्याने टाकळी- सोरेगाववरुन पाण्याचा उपसा होणार नाही.

या दुरुस्ती दरम्यानच्या कालावधीत स्मार्ट सिटीअंतर्गत समांतर जलवाहिनीला सोरगाव येथे जोडणी करण्यात येणार आहे.

पाणीपुरवठा विस्कळीत होणार असल्याने महापालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी सुधारित पाणी पुरवठ्याचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन के यांनी केले आहे.

# जिवंत देखावे ठरले लक्ष्यवेधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त नॉर्थकोट मैदान ते अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत शोभायात्रा काढली. ढोल- ताशांच्या गजरात आणि पिवळ्या फेट्यांच्या साक्षीने शोभायात्रेत अहिल्यादेवी होळकर, मल्हारी मार्तंड, म्हाळसा आणि बानू यांच्या रूपातील जिवंत देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. ही शोभायात्रा अहिल्यादेवींच्या कायार्ला आणि विचारांना केलेला मानाचा मुजराच ठरली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंतीनिमित्त यात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. उमेश काकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, अध्यासन केंद्राचे संचालक प्रभाकर कोळेकर, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक श्रीकांत अंधारे सहभागी झाले.



### खंडोबा आणि त्यांच्या पत्नींचे प्रभावी देखावे

खंडोबा म्हणजेच मल्हारी मार्तंड आणि त्यांच्या पत्नी म्हाळसा व बानू यांचे देखावेही प्रभावी होते. मल्हारी मार्तंडांच्या रूपातील कलाकाराने हातात खड्ग, भंडारा आणि घोड्यावर स्वार होऊन पराक्रमाचे दर्शन घडवले. म्हाळसा आणि बानू यांच्या रूपातील कलाकारांनी पारंपरिक वेशभूषा आणि अलंकारांनी सर्वांना मोहित केले.

### राजमाता अहिल्यादेवींचा सजीव देखावा

सोलापूर विद्यापीठाच्या वतीने राजमाता अहिल्यादेवींच्या रूपातील कलाकाराने साधी पण तेजस्वी वेशभूषा, कपाळावर कुंकू, गळ्यात मंगळसूत्र आणि हातात शिवपिंड धारण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या चेहऱ्यावरील सात्विक भाव, करारी नजर आणि आत्मविश्वासपूर्ण देहबोलीतून प्रत्यक्ष अहिल्यादेवीच साकार झाल्याचे या शोभायात्रेतून दिसत होते.

# माळशिरस तालुक्यातील १३५६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यात मे महिन्यात वादळी वारे व अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे १९५७ शेतकऱ्यांच्या १३५७.०७ हेक्टरवरील फळबाग व पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी दिली.



माळशिरस मंडलमधील २३१ शेतकऱ्यांचे १७३. १५ हे पिकाचे व ७१ शेतकऱ्यांचे ५६.१५ हे फळबागांचे नुकसान झाले. वेळापूर मंडलमधील १३६ शेतकऱ्यांचे १३६ हे. पिकाचे तर १०२ शेतकऱ्यांचे ७२.८ हे. फळबागांचे नुकसान झाले. महाळुंग मंडलमधील २४५ शेतकऱ्यांचे १७९.९ हे. पिकाचे तर ५३ शेतकऱ्यांचे २६.७ हे. फळबागांचे नुकसान झाले. पिलीव मंडलमधील ३८ शेतकऱ्यांचे २२.०३ हे. पिकाचे तर ३३ शेतकऱ्यांचे १७.८ हे. फळबागांचे नुकसान झाले. इस्लामपूर मंडलमधील १७ शेतकऱ्यांचे ८ हे. पिकाचे नुकसान झाले. दहिगाव मंडलमधील ३०४ शेतकऱ्यांचे १६० हे. पिकाचे तर २१ शेतकऱ्यांचे १६ हे. फळबागांचे नुकसान झाले.

अकलूज मंडलमधील २७ शेतकऱ्यांचे २४.८ हे. पिकाचे तर २० शेतकऱ्यांचे २१ हे. फळबागांचे नुकसान झाले. नातेपुते मंडलमधील २२४ शेतकऱ्यांचे १४० हे. फळबागांचे नुकसान झाले. तर ४३ शेतकऱ्यांचे २५ हे. फळबागांचे नुकसान झाले. फोंडशिरस मंडलमधील २२१ शेतकऱ्यांचे २२५ हे. पिकाचे तर १४ शेतकऱ्यांचे १० हे. फळबागांचे नुकसान झाले. खुडूस मंडलमधील ११८ शेतकऱ्यांचे ५९ हे. पिकाचे तर ३० शेतकऱ्यांचे २७.७९ हे. फळबागांचे असे एकूण १९५७ शेतकऱ्यांचे १३५६.०७ हेक्टरवरील पिकांचे व फळबागांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे तहसीलदार शेजुळ यांनी सांगितले.

# ईच्छा भगवंताची संस्थेच्या मोफत सर्व रोग निदान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीनं महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक व क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आणि ईच्छा भगवंताची परिवाराचे संस्थापक तथा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड आणि प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून रविवारी सकाळी प्रभाग क्रमांक २२ येथील सेटलमेंट ग्राउंड( मरगू मास्तर मैदान) येथे मोफत सर्व रोग निदान शिबिर आणि आपला दवाखाना या आरोग्य सेवेचा शुभारंभ करण्यात आला.दरम्यान सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार देवेंद्र कोठे, इच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, माजी नगरसेवक गुरुशांत दुत्तरगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, राष्ट्रवादी शहर सेक्रेटरी प्रमोद भोसले,राष्ट्रवादी महिला अध्यक्ष संगीता जोगदंनकर,



राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर, रुक्मिणी जाधव,सोलापूर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी अजित बोराडे, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष प्रमिला स्वामी, बिराजदार मावशी ,राष्ट्रवादी शहर सरचिटणीस संगीता गायकवाड यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमा पूजन करून दीप प्रज्वलनाने या शिबिराचे शुभारंभ करण्यात आले प्रारंभिक उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या मैदानावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले तदनंतर सर्वसामान्य नागरिकांना व गरजू रुग्णांना मोफत आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने आपला दवाखाना या आरोग्य सेवेचा शुभारंभ आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत लहान बालक गर्भवती माता आणि ज्येष्ठ नागरिक या तिघांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार किसन जाधव आणि चेतन नागेश गायकवाड यांनी केले. दरम्यान या परिसरातील नागरिकांना उत्तम दर्जाचे मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने गोरगरीब गरजू रुग्णांना मोफत औषधोपचार व्हाव्यात या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्यानें आपला दवाखाना या आरोग्य सेवा केंद्राचे या ठिकाणी शुभारंभ करण्यात आले या माध्यमातून परिसरातील नागरिकांना उत्तम दर्जाचें आरोग्य सेवा मिळेल नागरिकांना आरोग्य विषयक माहिती आणि मोफत औषधोपचार या पुढील काळात होईल अशी खात्री प्रास्ताविकात किसन जाधव यांनी व्यक्त केली. या शिबिरात विविध आजारांची तपासणी करण्यात आली ज्यात मधुमेह रक्तदाब हृदयविकार आणि इतर सामान्य आजाराचा समावेश होता तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली आणि योग्य मार्गदर्शन केले शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांना औषधं देण्यात आले. हजारो गरजू रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी बोलताना आमदार देवेंद्र कोठे म्हणाले की किसन जाधव, नागेश गायकवाड आणि चेतन गायकवाड हे नेहमी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असतात. नागरिकांना सर्व मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी ते नेहमी पाठपुरावा करीत असतात कोट्यावधी रुपयांचे कामे त्यांनी प्रभाग २२ विकासासाठी खेचून आणले आज मोफत शिबिरामुळे गरजू लोकांना आरोग्यसेवा मिळाले आपला दवाखाना या माध्यमातून आरोग्य सेवा आणखीनच सुधारणार आहे शिबिरामुळे आरोग्य सेवा आणि जनजागृती वाढण्यास मदत होते हा उपक्रम इच्छा भगवंताची परिवाराने राबविला हे कौतुकास्पद आहे या पुढील काळात देखील महायुतीतील घटक पक्ष म्हणून प्रभाग २२च्या सर्वांगीण विकासासाठी या पुढील काळात भरघोस निधी उपलब्ध करून देईन अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिला. यावेळी बोलताना माजी नगरसेवक गुरुशांत दुत्तरगावकर म्हणाले की सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून अनेक विकासाचे कामे किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी केले लक्ष्मण मामा जाधव यांच्या आशीवार्दाने जनसेवेचा वसा त्यांनी कायम ठेवला आहे असे ते म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी केले आहे राष्ट्रवादीचे विचारधारा हे लोकांमध्ये रुजवण्याचे कार्य देखील त्यांनी केले आहे या पुढील काळात त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीर उभे राहू असे मनोगत शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी व्यक्त केल.दरम्यान आमदार देवेंद्र कोठे यांनी इच्छा भगवंताची परिवाराचे सर्वेसर्वा संस्थापक लक्ष्मण मामा जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. सदर आरोग्य शिबिरास माजी नगरसेवक तौफिक शेख, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सचिव इरफान शेख,आसिफ राजे शेख, सलीम नदाफ, वसीम शेख, जावीर जे.डी, साबील आडते, अखिल नाईकवाडी, आर्दीनी किसन जाधव यांनी राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. सदर आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत जाधव, विनोद गायकवाड, उमेश जाधव, शरद शिंदे, सचिन गुत्तेदार, संतोष ऋतिक गायकवाड, हरीश तेलुगु, संतोष लोंढे, अमोल जगताप, किरण शिंदे, प्रथमेश पवार, संजय सांगळे, प्रज्ञासागर गायकवाड, दिनेश आवटे, शितल शिरसागर, किरण सगटे, तेजस गायकवाड, कार्तिक जाधव, उत्कर्ष गायकवाड, अजिंक्य जाधव, करण जाधव, माऊली जरग, माणिक कांबळे, वसंत कांबळे, फिरोज पठाण, महादेव राठोड, आनंद गाडेकर, हुलगप्पा शासम यांच्यासह इच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सदस्य आर्दीनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे, सविता कोळी पंढरपूर यांनी केले.

# खा. मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सादर केले रेल्वे प्रकल्पासाठी निवेदन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुबंई मंत्रालयात भेट घेऊन फलटण-पंढरपूर आणि जेऊर-चौंडी-आष्टी रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा भरण्यास मंजूरी देण्याबाबत निवेदन सादर केले. सदरचे प्रकल्प हे केंद्र सरकार व राज्य सरकारच्या संयुक्त कंपनीने करणेचे ठरले होते. त्याप्रमाणे सदरच्या दोन्ही प्रकल्पासाठी राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारला देणेबाबत तात्काळ मंजूरी देण्यात यावी ही विनंती केली जेणेकरुन सदरचे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होतील व याचा लाभ नागरिकांना होईल असे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देत विनंती केली आहे. फलटण-पंढरपूर हा रेल्वे मागार्साठीचे भूसंपादन अधिग्रहण सन १९२० साली झाले आहे. सदर प्रकल्पाचा विजयदादा खासदार असताना त्यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री



सुरेश प्रभु यांच्याकडे पाठपुरावा केला होता, त्यांच्या प्रयत्नातुन सन २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये ११४९ कोटी रुपयास मान्यता देण्यात आली असून सदरच्या प्रकल्पासाठी सन २०१७ साली रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयाची आर्थिक तरतूद करणेत आली आहे. जेऊर-चोंडी-आष्टी हा रेल्वे मार्ग प्रकल्पास सन २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १५६० कोटी रुपयास मान्यता देण्यात आली या प्रकल्पासाठी देखील २०१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयांची तरतूद करणेत आलेली आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी फलटण लोणंद रेल्वे मार्गाचे पूर्णत्वाबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरवा केला याचेच फलित म्हणून भूसंपादनच्या सर्वेक्षणास देखील २.१० कोटी रू देखील मंजूर झाले आहे. आता फक्त राज्य शासनाचे ५० टक्के हिस्सा भरून प्रकल्पाचे काम सुरू करून पूर्णत्वास घेऊन जाणे गरजेचे अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या निवेदनाची दखल घेत प्रकल्पांच्या प्रगतीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. या भेटीमुळे स्थानिक जनतेत या रेल्वे प्रकल्पांच्या पूर्णत्वाबाबत आशा निर्माण झाली आहे.

# गणपती फार्मसीमध्ये अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):** मौजे अकोले खुर्द ता. माढा येथे इतिहास आणि वारसा जल्लोषात साजरा करताना, श्री गणपती फार्मसी कॉलेजने अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

पारंपारिक दीप प्रज्वलनाने समारंभाची सुरुवात झाली. त्यानंतर भाषणाला सुरुवात झाली कॉलेज मधील प्रथम वर्षामध्ये शिकत असणाऱ्या साक्षी शीद, शितल बेंडगुडे आणि राज काळे ह्यांनी जिथे त्यांनी भारतीय इतिहासातील अहिल्यादेवी होळकरांच्या उल्लेखनीय योगदानावर प्रकाश टाकणारे मुख्य भाषण केले. मावळ्यांची राणी म्हणून त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी त्यांच्या



अनुकरणीय प्रशासनाबद्दल, सामाजिक न्यायासाठी त्यांची बांधिलकी आणि पायाभूत सुविधा आणि शिक्षणाच्या विकासासाठी केलेल्या सांगितले. सांगता मुख्याध्यापकांच्या प्रयत्न ांबद्दल कार्यक्रमाची महाविद्यालयाच्या आभार ज्यांनी यांच्या प्रदर्शनाने झाली. अहिल्यादेवी होळकरांच्या चिरस्थायी वारशाची सखोल जाणीव घेऊन गेले. कॉलेज च्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी त्यांच्या जीवनातील संघर्ष सांगून आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. आर.डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, व डॉ. प्रा प्रशांत मिसाळ, प्रा.नामदेव शिंदे , प्रा. शिवराज ढगे, प्रा. शैलेश पेंदोर इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा. प्रियांका खडसरे, प्रा. रुपाली राऊत व यांनी समन्वयक म्हणून काम केले.

# शिवरत्न तर्फे आयोजित मुला-मुलींसाठी उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिर संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्र व शिवरत्न कुस्ती केंद्रातर्फे १ मे ते ३१ मे या कालावधीत मुला-मुलींसाठी उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३१ मुली आणि ४८ मुले यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ. शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना



प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आणि शिबिराची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी शितलदेवी मोहिते-पाटील म्हणाल्या की, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील कुस्तीगीर मुले व मुलींना बौद्धिक, तांत्रिक तसेच आधुनिक कुस्तीतील नवीन डाव, नियम व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी हे केंद्र उभारण्यात आले आहे.ताराराणी महिला कुस्ती केंद्र व शिवरत्न कुस्ती केंद्रात सहभागींना फ्री स्टाईल, ग्रीको-रोमन, भारतीय शैलीतील मॅट कुस्ती, तसेच योगा व प्राणायामाचे प्रशिक्षण नियमित दिले जाते.

शिबिराच्या सांगता समारंभाला सचिव धर्मराज दगडे, अनिल जाधव, नितीन बनकर, श्रीकांत राऊत, दत्तात्रय लीके, राहुल जगताप, रामकृष्ण काटकर, काकासाहेब जगदाळे, राहुल कोडक, सतपाल सिंह, सुहास तरंगे, अश्रफ शेख,बाळासाहेब रणवरे व इतर मान्यवर उपस्थित होते.